# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक ०४/०८/२०२६ (मंगळवार )

.................................................................................................

## पोलीस स्टेशन कन्हान अंतर्गत खुन प्रकरणामध्ये २४ तासाच्या आत अज्ञात आरोपी निष्पन्न
## आरोपीला अटक ,कन्हान पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन कन्हान :— मा. श्री हर्ष ए. पोद्दार ,वरीष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा ,श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री संतोष गायकवाड ,उपविभागिय पोलीस अधिकारी ,कन्हान उपविभाग यांच्या मार्गदर्शनात कन्हान पोलीसांनी अज्ञात आरोपीने महिलेचा खुन केल्या प्रकरणाचा यशस्वी छडा लावत अवघ्या २४ तासात आरोपीस अटक केली आहे.

दिनांक ०३/०८/२०२६ रोजी रात्री रेल्वे ट्रॅकमॅन पेट्रोलींग करीत असतांना कन्हान नदीवरील जुन्या पुलाच्या दिशेने आवाज आल्याने त्यांनी टॉर्चच्या सहाय्याने पाहिले असता एक महिला पुलावरून खाली पडलेली दिसून आली. याप्रकरणी रेल्वे ट्रॅकमॅन यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे कन्हान येथे कलम १०३(१) भारतीय न्याय संहिता अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्हा घडला त्यावेळी आरोपी अज्ञात असल्याने पोलीसांसमोर आरोपीचा शोध घेण्याचे मोठे आव्हान होते. सदर गुन्हयासंदर्भात श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी प्रत्यक्ष घटनास्थळाला भेट दिली आणि तपास पथकाला योग्य सुचना आणि मार्गदर्शन केले. वरीष्ठ पोलीस अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्रीमती वैजयंती मांडवधरे, प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन कन्हान यांच्या नेतृत्वात कन्हान पोलीस स्टेशनच्या तपास पथकाने आरोपीचा शोध घेण्यासाठी विविध दिशांनी तपास सुरू केला.

तपासादरम्यान पोलिसांनी तांत्रिक माहिती, गोपनिय माहीती, साक्षीदारांचे बयाण तसेच इतर उपलब्ध पुराव्यांच्या आधारे आरोपीचा कसुन शोध घेतला असता आरोपी आशिष उर्फ

**मोनू किशोर मनपिया, वय ३१ वर्षे, रा. भिलगाव, ता. कामठी, जि. नागपूर याने सदर महीलेचा खुन केल्याचे निष्पन्न झाले. कन्हान पोलीसांनी तांत्रिक पुराव्याच्या आाधारे सापळा रचुन सदर आरोपीला नागपूर येथील ऑटोमोबाईल चौक परिसरातुन ताब्यात घेतले. अवघ्या २४ तासांच्या आत खुनाचा गंभीर गुन्हा उघडकीस आणून आरोपीस दिनांक ०४/०८/२०२६ रोजी सदर गुन्हयात अटक करण्यात आली. आरोपला दिनांक ११/०८/२०२६ रोजी पर्यंत पोलीस कोठडी रिमांड मंजुर झाला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास कन्हान पोलीस करीत आहेत.**

## गोवंश जनावरांची तस्करी करून कत्तलीकरीता वाहतुक करण्याच्या तयारीत असणाऱ्या ०६ आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद ५७ लाख ३९ हजार ५०० रूपयांचा मुद्देमाल जप्त २१ गोंवश जनावरांची सुटका, वडोदा पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन वडोदा :– **मा. श्री हर्ष ए. पोद्दार ,वरीष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा ,श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री संतोष गायकवाड ,उपविभागिय पोलीस अधिकारी ,कन्हान उपविभाग यांच्या मार्गदर्शनात वडोदा पोलीसांनी ६ आरोपींविरूध्द गुन्हा नोंद करत २१ गोवंशांना जिवनदान दिले. सदर कारवाईत ४ वाहनांसह ५७,३९,४००/— रूपयाचा मुददेमाल जप्त केला.**

दिनांक ०४/०८/२०२६ रोजी वडोदा पोलीस वडोदा चौक कुही फाटा येथे नाकाबंदी करीत असतांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, आसलवाडा शिवारात काही इसम गोवंश तस्करी करण्याचे उद्देशाने वाहनामध्ये निर्दयतेने गोवंश चढवत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे वडोदा पोलीसांनी तात्काळ आसलवाडा शिवार, कामठी येथे जावुन प्रत्यक्ष पाहणी केली असता चार वाहनामध्ये काही इसम गोवंश चढवतांना दिसुन आले. पोलीसांची चाहुल लागताच आरोपी घटनास्थळावरून पळुन जावु लागले. पोलीसांनी शिताफिने पाठलाग करून **आरोपी नामे १) विक्की सुरेश गजभिये, वय ३४ वर्ष, रा. अंबागड, ता. तुमसर, जि. भंडारा, २) शिवचरण उरकुड हटवार, वय ५५ वर्ष, रा. अंबागड, ता. तुमसर, जि. भंडारा, ३) अजीत विनायक निर्वाण, वय २९ वर्ष, रा. लाखनी, ता. लाखनी, जि. भंडारा,४) फैजान इरफान कुरेशी, वय ३७ वर्ष, रा. भाजीमंडी कामठी, ता.**

**कामठी, जि. नागपूर, ५) नुर मोहमद मकबुल कुरेशी, वय ३९ वर्ष, रा. भाजीमंडी कामठी, ता. कामठी, जि. नागपूर यांना पकडले. त्यानंतर अधिक तपास करून पोलसांनी सदर गुन्हयात आरोपी क्रं ६) सचिन शिवराम मरकाम, वय ४६ वर्षे, बाजार चौक, वडोदा याला ताब्यात घेतले आहे.**

पोलीसांना घटनास्थळावर १) १० चक्का ट्रक क्र. एम एच—४०/एन—७५१७ २) बोलेरो पिकअप गाडी क्र. एम एच—४०/सी डी—४९०६ ३) बोलेरो पिकअप गाडी क्र. एम एच—४०/सी एम १२४८ ४) मारूती सुझुकी गाडी क्र. एम एच—४०/सी ओ —९९०७ हे चार वाहन मिळुन आले. चारही वाहनात गोवंश जनावरांना चढविण्यात आलेले होते. नमुद आरोपी यांनी जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता, अंत्यत कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन, निर्दयतेने शिंगाला व पायाला आखुड दोरखंडाने बांधुन त्यांची कत्तलीकरीता वाहतुक करण्याच्या तयारीत होते.

**पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून १) ०४ वेगवेगळया कंपनीचे ॲन्डरॉईड मोबाईल किंमती ८०,०००/— रूपये २) २१ गोवंश (बैल) जनावरे किंमती ५,२५,०००/— रूपये ३) ०४ वाहने ५१,००,०००/—रूपये ४) नगदी ३४,४००/—रूपये असा एकुण किंमती ५७,३९,४००/— रूपयाचा मुददेमाल जप्त केला.नमुद प्रकरणी पाचही आरोपीतांविरूद्ध पोलीस स्टेशन वडोदा येथे कलम ११(१), (डी) (ई), (फ) प्राण्यांचा छळ अधिनियम १९६०, सहकलम ५ (अ), (१), (२), ९ महाराष्ट्र पशु सरंक्षण अधिनियम, सहकलम ३(५) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा नोंद केला आहे.**




## नागपूर ग्रामीण पोलीसांच्या प्रभावी प्रतिबंधात्मक कारवाईला यश;
## हद्दपार आदेशावरील आरोपीची अपील मा. विभागीय आयुक्तांकडून नामंजुर

**पोलीस स्टेशन भिवापुर** :— पोलीस स्टेशन भिवापूर हद्दीतील सराईत गुन्हेगार हरीष राजेश चमेडिया,वय ४१ वर्षे, रा. वार्ड क्र ६, भिवापुर, ता भिवापुर जि नागपुर याच्याविरुद्ध उपविभागीय दंडाधिकारी, उमरेड यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम, ५६ (१)(अ) अन्वये पारित केलेल्या चार महिन्यांच्या हद्दपार आदेशाविरुद्ध दाखल करण्यात आलेले अपील मा. विभागीय आयुक्त, नागपूर विभाग यांनी नामंजुर करत मूळ हद्दपार आदेश कायम ठेवला आहे. सदर इसमाविरुद्ध पोलीस स्टेशन भिवापूर येथे अवैध तंबाखू वाहतूक व विक्री तसेच इतर गंभीर स्वरूपाचे गुन्हे नोंद आहेत. त्याच्या बेकायदेशीर कृत्यांमुळे सार्वजनिक शांतता व सुव्यवस्थेला बाधा पोहोचत असल्याने मा. श्री हर्ष ए. पोद्दार ,वरीष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात भिवापुर पोलीसांनी सदर आरोपीचा हद्दपार प्रस्ताव सादर केल्यानंतर उपविभागीय दंडाधिकारी, उमरेड यांनी हद्दपार आदेश पारित केला होता.

**सदर आदेशाविरुद्ध अपील दाखल करण्यात आले होते. मात्र मा. विभागीय आयुक्तांनी प्रकरणातील सर्व पुरावे, पोलीस अभिलेख, दोन्ही पक्षांचा युक्तिवाद व वस्तुस्थितीचा सखोल विचार करून अपील नामंजूर केले व हद्दपार आदेश कायदेशीर व योग्य असल्याचे नमूद करत तो कायम ठेवला.**

# गोवंश जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपी विरूध्द गुन्हा नोंद ०४ गोवंश जनावरांची सुटका, पारशिवनी पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन पारशिवनी** :— दिनांक ०३/०८/२०२६ रोजी पारशिवनी पोलीसांनी अवैध धंदयांवर कारवाई करणेकामी पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलींग करीत असता पेट्रोलींग दरम्यान गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या जनावरांची कत्तलीकरीता वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी ईटगाव फाटा येथे नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान बोलेरो पिकअप क्रमांक एम एच—४०/बी जी ३३५२ मिळुन आले. पोलीसांनी वाहन थांबवुन तपासणी केली असता १) चालक नामे अर्जुन दामोदर भुसारी, वय ४८ वर्ष, रा. गव्हणा, ता. पारशिवनी हा मिळुन आला. पोलीसांनी वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये ०४ गोवंश जनावरे असे मिळुन आले. नमुद जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता, अंत्यत कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन, शिंगाला व पायाला आखुड दोरखंडाने बांधुन वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले. पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून बोलेरो पिकअप क्रमांक एम एच—४०/बी जी ३३५२ किंमती ४,००,०००/— रूपये आणि ४ गोवंश जनावरे किंमती २७,०००/— रूपये असा एकुण किंमती ४,२७,०००/— रूपयाचा मुददेमाल जप्त केला.

**नमुद प्रकरणी आरोपी चालक नामे अर्जुन दामोदर भुसारी, वय ४८ वर्ष, रा. गव्हणा, ता. पारशिवनी यांच्या विरूध्द पोलीस स्टेशन पारशिवनी येथे कलम ११(१), (डी) प्राण्यांचा छळ अधिनियम १९६०, सहकलम १८५ मोटार वाहन कायदा अन्वये गुन्हा नोंद केला आहे.**

# अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध ०८ गुन्हे नोंद

दिनांक ०३/०८/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, मोहाफुल दारू, मोहाफुल रसायन सडवा, ईतर साहित्य असा एकुण १,४४,९२०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण ०८ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन खापा** येथे आरोपी नामे अनिकेत भय्याजी बोरकर, वय २९ वर्ष, रा. खैरी पंजाब, ता. सावनेर याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन केळवद** येथे आरोपी नामे धिरज तुळशीदेव धपके, वय २९ वर्ष, रा. खुरजगाव, ता. सावनेर, जि. नागपूर याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन रामटेक** येथे आरोपी संजय हरिदास धुर्वे, वय ३५ वर्ष, रा. काचुरवाही वार्ड क्र. ०३, ता. रामटेक याचेवर १ गुन्हा नोंद. **पोलीस स्टेशन कुही येथे** आरोपी क्र. १) तुलाराम तुळशीराम चाचरकर, वय ६० वर्ष, रा. वार्ड क्र. ०२, काळेश्वर मंदीर, कुही ता. कुही, जि. नागपुर २) अनिकेत चरण चनोड, वय २२ वर्ष, रा. खेंडा, ता. कुही, जि. नागपुर याचेवर प्रत्येकी १ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन पाचगाव येथे** ०२ महिला आरोपी यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन नरखेड येथे** आरोपी राजेश शंकरराव वानखेडे, वय ३२ वर्ष, रा. सिंगारखेडा, त. नरखेड याचेवर १ गुन्हा नोंद,

**नमुद कारवाईत एकुण २५२० मिली देशी दारू, २४० लिटर मोहाफुल दारू, २६०० लिटर मोहाफुल रसायन सडवा, इतर साहित्य असा एकुण १,४४,९२०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

# नागपुर ग्रामीण जिल्ह्यातील ७२३ रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्‌दार, वरीष्ठ पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक ०४/०८/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील २४ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. **एकुण ७२३ आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**

**नागपुर उपविभाग** :— नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बुट्टीबोरी येथे २८ आरोपी, पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३३ आरोपी अशा एकुण ९१ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :— उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे ४६ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे २७ आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे २२ आणि पोलीस स्टेशन वेलतुर २७ आरोपी पोलीस स्टेशन पाचगाव १२ आरोपी अशा एकुण १३४ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग :—** सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ५८ आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे ३१ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे १६ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३२ आरोपी, पोलीस स्टेशन मोहपा येथे १५ आरोपी अशा एकुण १५२ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३२ आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे २० आरोपी पोलीस स्टेशन वडोदा येथे १६ आरोपी अशा एकुण ६८ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग :—** रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे ३३ आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३१ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे २२ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे २४ आरोपी अशा एकुण ११० रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग :—** काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ५७ आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे २७ आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ५१ आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे ३३ आरोपी अशा एकुण १६८ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.




महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय
पोलीस स्टेशन खापा
दुरध्वनी क्रं : 07113-286122
जि. नागपुर (ग्रा.)







मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने